# MARATHI (LL)

## SOLUTION : PRACTICE ACTIVITY SHEET 1

**प्र. 1. (अ)**

**(1)** **या दोन दिवशी अब्दुल तपोवनात बांगड्या भरायला जाई**

- संक्रांत
- ज्येष्ठ पौर्णिमा

**(2)**

(i) संक्रांतीला अब्दुल येथे जात असे – तपोवनात

(ii) आंब्याच्या झाडाखाली अब्दुल यावर बसला – चौथऱ्यावर

(iii) तपोवनातील स्त्रिया व मुलींना अब्दुल वाटे – देवदूत

(iv) अब्दुलला तपोवनातील मुली म्हणत – चुडीवाला

**(3)** अब्दुलमियाँ संक्रांतीच्या व ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशी न चुकता तपोवनात जात असे. तेथे जाऊन तो तेथील स्त्रिया व मुलींना मोफत बांगड्या भरत असे. त्या स्त्रियांच्या व मुलींच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून त्याला आंतरिक समाधान होत असे. यावरून त्याची समाजसेवेची तळमळ लक्षात येते. एरव्ही या सणाला तपोवनात न जाता, गावात बांगड्या विकल्या असत्या, तर अब्दुलमियाँची खूप कमाई झाली असती; पण असा व्यवहारी व स्वार्थी विचार त्याने कधीच केला नाही. यावरून त्याला समाजसेवा करण्यात खूप आनंद होत असे, हे स्पष्ट होते. तो स्वभावाने अतिशय साधा, सात्त्विक व नम्र होता. केवळ सत्कारासाठी त्याने समाजसेवेचे व्रत घेतले नव्हते; म्हणून 'अब्दुल थोर समाजसेवक' हे विधान सार्थ आहे.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) **वाघिणीने शिकार साधली असावी**

- सांबर
- रानगवा
- नीलगाय
- रानडुक्कर

*(**नोंद :** वरील चार चौकटींतील उत्तरांपैकी कोणतीही दोन उत्तरे योग्य.)*

(ii) **वाघिणीच्या पिल्लांचे खेळ**

- एकमेकांचा पाठलाग करणे
- मारामारी करणे
- पाण्यात उड्या घेणे

*(**नोंद :** वरील तीन चौकटींतील उत्तरांपैकी कोणतीही दोन उत्तरे योग्य.)*

**(2)** (i) पिल्लांचे व स्वत:चे पोट भरण्यासाठी सतत कोणती ना कोणती शिकार करण्याच्या कलेत वाघीण पारंगत होती.

(ii) लेखकाने वाघिणीतल्या आईची एक वेगळीच झलक पाहिली.

**(3)** रात्र झाली. वाघिणीने पिल्लांना जांभळीच्या दाट झुडपात लपवले. म्हणाली, ''इथे गुपचूप राहा. आवाज करू नका. मी शिकार करून काही खायला मिळते का ते बघते.'' पिल्लांनी मान डोलावली आणि ती एकमेकांच्या अंगावर रेलत गुपचूप राहिली. वाघीण झुडपाबाहेर आली. तिने चौफेर संरक्षक नजर फिरवली आणि निश्चिंत होऊन मार्गस्थ झाली. रात्रभर जंगलात फिरून एका सांबराची शिकार करून ती परत पिल्लांजवळ आली. आईची चाहूल लागताच सर्व पिल्ले तिच्याकडे झेपावली. तिला बिलगू लागली. ''छान शिकार केलीयं बाळांनो, आपण खायला जाऊ या हं,'' असे म्हणत वाघीण पिल्लांना चाटू लागली. जरा वेळाने ती पाण्यात शिरली. पिल्लांचा आनंद गगनात मावेना. ती नाचू लागली, खेळू लागली. त्यांनीही धपाधप पाण्यात उड्या मारल्या. या प्रसंगातून आईची माया, प्रेमळपणा, शिस्त, सुरक्षा, काळजी या मातृगुणांची वाघिणीमध्ये झलक दिसते. वाघीण व पिल्ले यांच्यातील जिव्हाळा दिसतो. अशा प्रकारे लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली.

**प्र. 1. (इ)**

**(1)** (i) निसर्गरम्य

(ii) टेरेस हॉटेल

(iii) ज्युँ फ्रॉ

(iv) स्वीस काउबेल

**(2)** (i) ट्रमलबॅकमधील पायऱ्या पाण्याचे तुषार पडून निसरड्या झाल्या होत्या; म्हणून त्या काळजीपूर्वक चढाव्या लागल्या.

(ii) आदित्यने अम्मासाठी एक छानशी स्वीस काउबेल खरेदी केली.

**प्र. 2. (अ)**

**(1)** (i) वणवा

(ii) वासरू

(iii) पाडस

(iv) धेनू (गाय)

**(2)** (i) जेव्हा बाळ आगीत पडते.

(ii) जेव्हा पक्षिणीचे पिल्लू झाडावरून खाली पडते.

**(3)** (i) अग्नी – आग

(ii) कनवाळू – ममताळू/दयाळू

(iii) माता – आई

(iv) पिलीं – पिल्ले/बाळे.

**(4)** संत नामदेवांनी श्रीविठ्ठलाला आई म्हटले आहे आणि आपण स्वतः तिचे लहान बालक आहोत, अशी भावना अभंगात व्यक्त केली आहे. आई बाळाची काळजी घेते. त्याचे दुखले-खुपले मायेने पाहते. बाळाला काही लागले, तर तिचा जीव कासावीस होतो. तशीच हरिणी आगीत सापडलेल्या बाळाचे रक्षण करण्यासाठी धावत वेगाने जाते. तसेच झाडावरून पडलेल्या पिलाला वाचवण्यासाठी पक्षिणी त्याच्याकडे झेप घेते. आई दयाळू आहे. विठूमाउलीने आपला सांभाळ करावा, पालन करावे, संसाररूपी आगीत होरपळणाऱ्या आपल्या मनावर मायेची फुंकर घालावी; कृपा करावी, असे संत नामदेवांना वाटते. अशा प्रकारे संत नामदेवांनी आई, प्राणी, पक्षी यांच्या मातृप्रेमाचे वर्णन कवितेत केले आहे.

**प्र. 2. (आ) कविता –** रंग मजेचे रंग उद्याचे

(1) **प्रस्तुत कवितेच्या कवयित्री** ⟶ अंजली कुलकर्णी.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ 'रंग मजेचे रंग उद्याचे' या कवितेतून कवयित्रींनी संगणक युगातही निसर्गाची दौलत जोपासायला हवी, हे सुंदर शब्दांत सांगितले आहे.

(3) **प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश** ⟶ 'रंग मजेचे रंग उद्याचे' या कवितेमध्ये कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी यंत्रयुगातही पर्यावरण सुंदर ठेवावे, म्हणजे मानवी मनेही समृद्ध होतात हा संदेश दिला आहे. मानवाने पर्यावरणाची जोपासना केली पाहिजे. निसर्गाशी रममाण होऊन जगण्यातच खरा आनंद आहे, हा महत्त्वाचा संदेश ही कविता देते.

(4) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** ⟶ यंत्राच्या, संगणकाच्या युगामध्ये निसर्गप्रेमाचे महत्त्व सांगणारी ही कविता मला खूपच आवडली. कारण यंत्रयुगात पर्यावरणाचा झपाट्याने नाश होत आहे. पर्यावरणाची होणारी हानी थांबवून, पर्यावरणाचे रक्षण आपण केले पाहिजे. तरच निसर्गाच्या विविध मनोहारी सौंदर्यात जगण्याचा मनस्वी आनंद आपणांस मिळू शकेल.

(5) **कवितेतील शब्दांचे अर्थ –** (i) डोंगर – पर्वत (ii) गोष्ट – कहाणी (iii) अनोखी – वेगळी (iv) धवल – पांढरेशुभ्र

**किंवा**

**कविता –** स्वप्न करू साकार

(1) **प्रस्तुत कवितेचे कवी** ⟶ किशोर पाठक.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न या कवितेत रेखाटले आहे.

(3) **प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश** ⟶ या देशभक्तीपर गीतात देशाची कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकात्मतेचे सामर्थ्य या मूल्यांचे महत्त्व सांगितले आहे. भारतीयांचा या मातीवरती हक्क आहे आणि नव्या पिढीचे व नव्या युगाचे स्वप्न साकार करणे या कर्तव्याची जाणीव करून दिली आहे.

(4) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** ⟶ या देशभक्तीपर गीतात नव्या पिढीचे व नव्या युगाचे स्वप्न साकार करण्यासाठी कवींनी मार्गदर्शन केले आहे. हे करताना कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकात्मतेचे सामर्थ्य या मूल्यांचा पुरस्कार केला आहे. नवीन पिढीसाठी नवी स्वप्ने साकार करण्याचा विचार मांडणारी ही कविता मला आवडली.

(5) **कवितेतील शब्दांचे अर्थ –** (i) संपदा – संपत्ती (ii) तन – शरीर (iii) मंगल – पवित्र (iv) अपरंपार – अमाप

प्र. 3.

**(1)** **सग्वारो कॅक्टस** → कॅक्टसच्या अनेक जाती आहेत. परंतु सग्वारो कॅक्टस हा कॅक्टसचा राजा शोभतो.

**सग्वारो कॅक्टसचे दिसणे** →

सग्वारो कॅक्टस राक्षसासारखा सुमारे ५० फूट उंचीपर्यंत वाढतो. पन्नास वर्षांत तो फक्त ३ फूट वाढतो, एवढी त्याची वाढ तोकडी आहे. तो सुमारे २०० वर्षे जगतो. पाणी साठवता येईल याप्रमाणे त्याची नैसर्गिक अंगरचना असते. त्याच्या अंगावर पन्हाळीसारख्या घड्या असतात.

**सग्वारो कॅक्टसचा उपयोग** →

तहान शमवण्यासाठी अवर्षणाच्या काळात कॅक्टस ठेचून त्याचे पाणी काढता येते. सग्वारो कॅक्टसला फळे येतात. त्यामधला गर कलिंगडाच्या गरासारखा असतो. रेड इंडियन्स ही फळे खातात. फळाच्या गरात साखर घालून मोरवळ्यासारखा टिकवता येतो. हेही रेड इंडियन्सचे खाद्य आहे.

**(2)** डॉ. होमी भाभा यांच्या मते, स्वत:च काम निर्माण करणे आणि काय काम करावे, हे स्वत:च ठरवणे हा सकारात्मक विचार प्रत्येकाने करायला हवा. बॉसने सांगितले तेवढेच काम करणे, ही चुकीची वृत्ती आहे. चिंता करीत न बसता, कामात गढून गेले की स्काय इज द लिमिट ही परिस्थिती निर्माण होते. कोणीतरी बोट धरून चालवेल, मार्ग दाखवेल ही स्थिती सुरुवातीला ठीक आहे. परंतु शेवटी स्वत:चे मार्ग स्वत: शोधणे, स्फूर्ती मिळवणे व कार्यात प्रवीण होणे हे ध्येय असावे. यालाच 'स्काय इज द लिमिट' असे म्हटले आहे.

**(3)** 'जाता अस्ताला' या गुरुदेव टागोरांच्या बंगाली कवितेत व श्यामला कुलकर्णी यांनी केलेल्या रूपांतरात सूर्य व पणती ही तेजाची दोन प्रतीके मांडली आहेत.

सूर्य दिवसभर पृथ्वीला ऊर्जा देतो, चैतन्य देतो. परंतु अस्ताला जाताना मनात खंत करतो की, माझ्या मागे या पृथ्वीला प्रकाश कोण देईल? अशा वेळी एक छोटी पणती पुढे येते नि ती सूर्याला म्हणते – मला जमेल तशी या पृथ्वीला मी उजळीत ठेवीन. पणतीच्या या उदाहरणातून असा संदेश मिळतो की सत्कार्य ज्याचे त्याने कुवतीप्रमाणे करीत राहावे. सेवा करण्याचा आपला वाटा उचलावा. मनापासून केलेले कार्य मोठे किंवा छोटे ठरत नाही. अंधारामध्येही प्रकाश देण्याची शक्ती छोट्या पणतीतही असते. तिनेही उजेड देण्याचा वसा घेतला आहे.

प्र. 4. (अ)

**(1)** (1) उद्गारार्थी वाक्य

(2) प्रश्नार्थी वाक्य

**(2)** (1) नकारार्थी वाक्य – साहित्याचे रंग कोमेजले नाहीत.

(2) उद्गारार्थी वाक्य – किती छान नाचला बँकॉकमधील चाओ फ्राया प्रिन्सेस क्रुझवर आदित्य!

**(3)** (1) रममाण होणे – **अर्थ :** गुंगुन जाणे.

**वाक्य :** नाट्यसंगीत ऐकताना बाबा रममाण होतात.

(2) आ वासून पाहणे – **अर्थ :** आश्चर्याने पाहणे.

**वाक्य :** माथेरानच्या सुंदर दृश्याकडे सायली आ वासून पाहत राहिली.

(3) अंगाचा तिळपापड होणे – **अर्थ :** खूप संताप येणे.

**वाक्य :** सोहमने घरभर केलेला कचरा पाहून आईच्या अंगाचा तिळपापड झाला.

**प्र. 4. (आ)**

**(1)** **(i)** (1) धाडस = हिंमत

(2) आदेश = आज्ञा

**(ii)** लिहिता-वाचता न येणारा – निरक्षर

**(iii)** (1) टाच – स्त्रीलिंग

(2) दार – नपुंसकलिंग

**(iv)** (1) रस्ते – अनेकवचन

(2) माणूस – एकवचन

**(2)** (1) विश्वकोश

(2) कविता

(3) ज्ञानपीठ

(4) दुष्काळ

**(3)** (1) माझी आई हे माझे 'संस्कार केंद्र' होते.

(2) कल्पनांचा सुंदर आविष्कार कवितेत असतो, हे बरोबर ना?

**प्र. 5. (अ), (आ) व (इ) ...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

***उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी***
***'नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'***
***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***